# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१६ / अग्रहायन २३, १९३८ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६५**

---

### मुंबईतील देवनार पशुवधगृहात बेकायदेशीरपणे पार्किंगच्या पावत्या देवून वसूली करीत असल्याबाबत

**(१) * २३५०१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार पशुवधगृहातील पार्किंग कंत्राटदार गाडी मालकांना बेकायदेशीरपणे पावत्या देवून पैसे वसूल करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व गाडी चालकाकडून बेकायदा पैसे वसूल करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

बकरी ईद २०१६ या कालावधीत नागरिकांच्या वाहनांच्या पार्किंगकरिता पे ॲण्ड पार्कची सुविधा पुरविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे.संबोधी बेरोजगार सेवा सहकारी सोसायटी मर्यादित या कंत्राटदारास कंत्राट देण्यात आले होते.

तथापि, सदर कंत्राटदाराने महानगरपालिकेमार्फत ठरवून दिलेले शुल्क वसुल न करता अवाजवी शुल्क वसुल केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत मे.संबोधी बेरोजगार सेवा सहकारी सोसायटी मर्यादित या कंत्राटदारास दिनांक ०६/०९/२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

सदर नोटीशीस कंत्राटदाराने दिनांक ०७/०९/२०१६ रोजी दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्यामुळे महानगरपालिकेमार्फत सदर संस्थेचे कंत्राट तात्काळ रद्द करण्यात आले व दिनांक ०९/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये, सदर संस्थेने भरलेली इसारा अनामत रक्कम रूपये १,००,०००/- जप्त करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुर्ला-कसाईवाडा येथील पुलाचे अपुर्ण काम पुर्ण करणेबाबत

**(२) * २४७७१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला-कसाईवाडा या पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेच्या कंत्राटदारांकडून अपुर्ण अवस्थेत ठेवण्यात आले असून येथे पूलाच्या लोखंडी सळ्या बाहेर आल्याने अपघात होण्याची शक्यता असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा प्रकारे अपुर्ण काम करणाऱ्या कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कंत्राटदाराकडून कुर्ला-कसाईवाडा या पुलाचे काम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यात आले नसून पुलाचे काम नाल्यावर असल्यामुळे पावसाळ्यात ते बंद होते. सदर काम टप्प्याटप्याने करावयाचे असल्यामुळे लोखंडी सळ्या बाहेर काढून पुढचे काम करणे आवश्यक होते. पावसाळ्यानंतर पूलाचे उर्वरित काम सुरू करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर पुलाच्या कामामध्ये बांधकामे व सार्वजनिक शौचालये बाधीत होत होती. सार्वजनिक शौचालयाची पर्यायी व्यवस्था तसेच या ठिकाणी असलेल्या बांधकामांचे निष्कासन/पर्यायी व्यवस्था करण्यात वेळ लागला.

सदर पुलाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम जानेवारी, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

**उस्मानाबाद शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत**

**(३) * २५५७६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहराला सध्या पाणीपुरवठा उजनी जलाशयातून केला जातो, मात्र केवळ नगरपालिकेच्या अयोग्य नियोजनामुळे पावसाळ्यात शहरवासीयांना दहा दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध पाणी साठ्याचे नियोजन करून शहराला आठवड्यातून किमान दोन वेळा पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अपूऱ्या पर्जन्यमानामुळे शहरालगतचे तेरणा रुईभर, शेकापूर हे पाणी स्त्रोत कोरडे पडल्यामुळे उस्मानाबाद शहरास माहे एप्रिल, २०१३ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत फक्त उजनी धरणावरुन पाणी पुरवठा करण्यात येत होता.

सद्य:स्थितीत उजनी व तेरणा उद्भव येथून उस्मानाबाद शहरास आठवडयातून दोन वेळा पाणीपुरवठा सुरु आहे.

पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी उस्मानाबाद शहरास केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेतून रुपये ६८.०१ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.

सदर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाने विहित केलेल्या १३५ लिटर प्रति दिन प्रति माणसी या मानकानुसार पाणीपुरवठा होणार आहे.

-----------------

**घाटकोपर येथे पोलिसांसाठी स्मार्ट टाऊनशिप उभारण्याबाबत**

**(४) * २५८८२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांना घरे उपलब्ध करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचाच भाग म्हणून पोलिसांसाठी घाटकोपर येथे ८००० घरांची स्मार्ट टाऊनशिप उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पोलिसांसाठी घाटकोपर येथे स्मार्ट टाऊनशिप उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाने**
**नियमबाहय पध्दतीने देयक मंजूर केल्याबाबत**

**(५) * २३९१२ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेने विविध गैरप्रकारांबद्दल काळया यादीत टाकण्यात आलेल्या ठेकेदारांचे महापालिकेच्या आरोग्य विभागाने नियमबाहय पध्दतीने देयक मंजूर करुन त्यांना देण्यात आल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरकारभाराला शासकीय अधिकारीच पाठिंबा देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांचे नियमबाहय देयक मंजुर करुन देणा-या सोलापूर महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अशी बाब निदर्शनास आलेली आाहे.

(२) व (३) या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या महानगरपालिकेच्या तत्कालिन वैद्यकिय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरूध्द खातेनिहाय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महापालिकेतील कंत्राटी कामगारांचे थकित वेतन तात्काळ अदा करणेबाबत**

**(६) * २५६६४ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेतील सुमारे चार हजार कंत्राटी कामगारांना तीन-तीन महिने वेतन, बोनस, ई.एस.आय, भविष्यनिर्वाह निधी व अन्य लाभांपासून महापालिकेतील कंत्राटदार व प्रशासनाच्या गैरकारभारामुळे कामगारांना वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार पुणे महापालिकेतील कंत्राटी कामगारांना वेतन व इतर सुविधा देण्याच्या दृष्टीने तसेच कंत्राटदार व दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेच्या एकूण ११ विभागामध्ये कामे करण्यासाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराकडील सुमारे २०५६ कामगारांना जून/जुलै, २०१६ चे वेतन, बोनस, भविष्यनिर्वाह निधी इत्यादी लाभ मिळाले नसल्याचे चौकशी अंती दिसून आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदरच्या कंत्राटी कामगारांचे थकीत असलेले वेतन ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ या कालावधीत फरकासह अदा करण्यात आले आहे.

- तद्नंतरही ऑक्टोबर व नोव्हेंबर अखेरपर्यंतचे वेतन अदा करण्यात आले असून सद्यस्थितीत कोणतेही देयक प्रलंबित नाही.
- काही क्षेत्रिय कार्यालयाकडे निविदांचा कालावधी संपुष्टात येणे, नविन निविदा मंजूर न होणे, करारनाम्यांची पुर्तता न होणे, ठेकेदाराला वर्कऑर्डर न मिळणे, इ. कारणास्तव कामगारांना वेतन अदा करण्यास विलंब झाला होता.
- यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली आहे.
- तसेच कर्मचारी भविष्यनिधी संघटन क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनी केलेल्या चौकशीअंती काही ठेकेदारांनी कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधी रक्कम पुर्णत: न भरल्याचे आढळून आले होते. याबाबत दिनांक ५/५/२०१६ रोजीच्या आदेशानुसार १३ ठेकेदारांकडून रुपये ६४,१४,०७/- ई.पी.एफ. कार्यालयाकडे भरणा करण्यात आलेली आहे.
- यापुढे कामगारांचे वेतन थकीत राहू नये याकरीता सर्वतोपरी दक्षता घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो रेल्वे प्रकल्पाबाबत

**(७) * २४८५६ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-भिवंडीसह कल्याणपर्यंत मेट्रो रेल्वेचा सविस्तर प्रकल्प अहवाल इटालियन कंपनीने तयार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मेट्रो प्रकल्पाला एमएमआरडीएकडून मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याणपर्यंत मेट्रो रेल्वे प्रकल्प तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करुन सदरील प्रकल्प लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) ठाणे-भिवंडी-कल्याण परिसरातील वेगाने होणारा विकास लक्षात घेता दैनंदिन प्रवाशांची संख्या अंदाजित करणे, संरेखन, तपासणी तसेच सर्व तंत्रज्ञ यांचा विचार करुन कार्यक्षम परिवहन सेवेच्या निवडीबाबतचा अभ्यास करुन अहवाल तयार करण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेसर्स डी. ऑपोलोनिया एसपीए जीनिवा, इटाली आणि टीसीई लि. मुंबई (संयुक्त उपक्रम) यांची सल्लागार म्हणून फेब्रुवारी, २०१५ मध्ये नियुक्ती केली. सदर सल्लागाराकडून प्रकल्पाचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालातील शिफारशीनुसार मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४१ व्या बैठकीत मान्यता दिली असून पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

**सफाई कामगारांच्या घरांच्या उभारणीमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(८) * २३५८७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतींसाठी आश्रय योजना सुरु करण्याची घोषणा सहा वर्षांपूर्वी केली असून यासाठी सुमारे १८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महापालिकेने गेल्या पाच वर्षात केवळ दोनच वसाहतीच्या पुनर्विकासाची योजना तयार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित सफाई कर्मचा-यांच्या वसाहतीची दुरवस्था झाली असून सदर कर्मचारी बिकट परिस्थितीत राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सफाई कामगारांच्या हक्काच्या घरांच्या उभारणीसाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वसाहतीसाठी महापालिकेने "आश्रय योजना" सुरु करण्याची घोषणा सन २००८ मध्ये केली, हे खरे आहे.
(२) सफाई कामगारांच्या वसाहतीकरीता मुंबई शहर व मुंबई उपनगरात (पूर्व व पश्चिम) मिळून ३९ याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

<u>मुंबई शहर:-</u>

सफाई कामगारांच्या २० ठिकाणच्या वसाहतींचा पुनर्विकास प्रस्तावित आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- १५ आराखडे इमारत प्रस्ताव (विशेष कक्ष) यांचेकडे मंजूरीकरीता सादर.
- ७ आराखड्यांना मंजूरी प्राप्त झाली आहे

मंजूरी प्राप्त ७ आराखड्यांपैकी एका ठिकाणी काम सुरु असून दोन ठिकाणांकरीता निविदा मागविण्यात आल्या आहेत. उर्वरित ४ ठिकाणांचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

<u>मुंबई उपनगर:-</u>

सफाई कामगारांच्या १९ ठिकाणच्या (पश्चिम उपनगरे-११, पूर्व उपनगरे-८) वसाहतींचा पुनर्विकास प्रस्तावित आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- पश्चिम उपनगरातील ११ पैकी ४ ठिकाणी नियोजन व आराखडे तयार करण्याकरीता वास्तूविशारद सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.
- पूर्व उपनगरातील ८ पैकी ३ ठिकाणी नियोजन व आराखडे तयार करण्याकरीता वास्तू विशारद सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) अस्तित्वात असलेल्या सफाई कामगारांच्या वसाहतीतील इमारतींची वेळोवेळी आवश्यकतेनुसार इमारत परिरक्षण आणि संबंधित खात्यामार्फत दुरुस्ती करण्यात येते.

मुंबई शहर व उपनगरे येथे अतिधोकादायक स्वरुपाच्या १३ इमारती असून सदर इमारती रिकाम्या करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत व धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(४) व (५) राज्यातील नगरपालिकेतील/महानगरपालिकेतील ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या पात्र वारसांना मालकी तत्वावर २६९ चौ.फूट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी ४.०० या कमाल चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५० टक्के सदनिका सेवानिवासस्थान म्हणून व उर्वरीत ५० टक्के सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यास दिनांक १२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

----------------

**कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथील स्कायवॉकच्या कामाबाबत**

**(९) * २४४०५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) (जि. ठाणे) येथील नागरिकांसाठी रेल्वे स्थानकांपर्यंत विना अडथळा ये-जा करता यावी यासाठी रेल्वे, एमएमआरडीए आणि कल्याण-डोंबिवली महापालिका यांच्या माध्यमातून सन २००९ मध्ये ३२ कोटी अंदाजित खर्चाच्या स्कायवॉकला मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्कायवॉकला मंजूरी दिल्यानंतर त्याचे काम प्रत्यक्षात सन २०११ साली सुरू करण्यात आले असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६४० मीटरच्या कामात सुरूवात होवून त्यासाठी २० कोटी खर्चही झाला असून अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही, तसेच कामही निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे या कामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण स्थानक ते सिध्दार्थनगर मार्गे गणपती चौक या स्कायवॉकच्या कामापैकी प्रत्यक्षात किती टक्के काम पूर्ण झाले आहे व उर्वरित काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात सन २००८ मध्ये कल्याण रेल्वे स्थानक ते सिद्धार्थनगर या ३७० मीटर लांबीच्या प्रकल्पाकरीता येणाऱ्या रुपये १५.६३ कोटी खर्चाच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली होती.

तद्नंतर फेब्रुवारी, २०१४ मध्ये अतिरिक्त लांबीच्या स्कायवॉकसह उच्चस्तरीय तिकीट घराच्या कामास एकूण रुपये ३२.८१ कोटी एवढ्या खर्चाच्या प्रकल्पास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.
(२) या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यातील ३७० मीटर लांबीच्या स्कायवॉकपैकी ३३५ मीटर लांबीचे काम एप्रिल, २०१६ मध्ये पुर्ण झाले आहे. उर्वरित ३५ मीटर लांबीचे काम रेल्वे प्रशासनाच्या मान्यतेअभावी प्रलंबित होते. याबाबत रेल्वे प्रशासनाने ऑक्टोबर, २०१६ मध्ये परवानगी दिल्यानंतर उर्वरित ३५ मीटर लांबीचे काम सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहे.

सदर कामाकरीता अद्यापपर्यंत रुपये १७.१५ कोटी एवढा खर्च झाला आहे. हे काम आवश्यक दर्जानुसार झाले असून कामाचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) कल्याण स्थानक ते सिद्धार्थनगर या पहिल्या टप्प्यातील स्कायवॉकचे काम ९५ टक्के पुर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

या प्रकल्पांतर्गत दुसऱ्या टप्प्यातील काम ३५ टक्के पुर्ण झाले असून उर्वरित काम मार्च २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील मेट्रो व इतर प्रकल्पाबाबत

**(१०) * २४५४६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक १७३७० ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मेट्रो प्रकल्पाला सार्वजनिक गूंतवणुक मंडळाने (पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्ड-पीआयबी) दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास नवी दिल्ली येथे पार पडलेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून पुणे व नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम नागपूर मेट्रो रेल्वे कार्पोरेशन लि.या कंपनीला देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे १२ हजार २९८ कोटी रुपयांचा खर्च येणे अपेक्षित असल्याने सदर निधी कशाप्रकारे व किती कालावधीत उपलब्ध करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पाची मंजुरी, कचरा प्रक्रिया प्रकल्पांसाठी जागा, समान पाणीपुरवठा योजना, नदी सुधारणा, रखडलेली भामा-आसखेड योजना, शहराच्या हद्दीतील प्रस्तावित रिंगरोडसाठी (एचसीएमटीआर) जागा, मलनि:सारण प्रकल्प इत्यादी दिर्घ काळापासून प्रलंबित असलेले प्रकल्प मार्गी लागावे यासाठी चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास पुणे येथे लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकारी यांच्या आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त बैठकीत प्रमुख प्रश्न दोन ते तीन महिन्यात मार्गी लावण्यात येतील असे आश्वासन दिले असतानाही प्रत्यक्षात कोणतेही प्रश्न सुटलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी एकच राज्यस्तरीय विशेष हेतू वहन कंपनी (SPV) ठेवण्याच्या अनुषंगाने यापूर्वी स्थापन झालेल्या नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन अशा एका राज्यस्तरीय विशेष हेतू वहन कंपनी (SPV) मध्ये परिवर्तन करून पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी वेगळी विशेष हेतू वहन (SPV)

स्थापन करण्याऐवजी सदर प्रकल्पाची अंमलबजावणी या एकाच राज्यस्तरीय विशेष हेतू कंपनीकडे सोपविण्यास राज्य शासनाची सहमती केंद्र शासनास कळविण्यात आली आहे.

(२) पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पाचा टप्पा-१ मधील मार्गिकांसाठी महानगरपालिकांचा एकूण १०% आर्थिक सहभाग, राज्य शासनाचा २०% सहभाग, केंद्र शासनाचा २०% सहभाग व उर्वरित ५०% रक्कम कर्ज वा तत्सम आर्थिक स्त्रोताद्वारे उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च हा सन २०१६-१७ ते सन २०२२-२३ या कालावधीमध्ये उभारण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) प्रश्न भाग-३ मध्ये नमूद केलेल्या पुणे शहरातील प्रकल्पापैकी

अ) पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाची दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी बैठक संपन्न झाली व त्यांचेमार्फत केंद्रीय मंत्रिमंडळाकडे सदर प्रकल्पाची आर्थिक सहभागासह अंतिम मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली असून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाची पुढील कार्यवाही होऊ शकणार आहे.

आ) कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी जागेच्या अनुषंगाने पर्यायी वनीकरण, जागेच्या कामापोटी तसेच वृक्ष तोडीकरीता एकूण रूपये २,१३,१९,७२६/ एवढी रक्कम वन विभागाकडे भरण्यात आलेली आहे. वनीकरणासाठी पर्यायी जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

इ) पुणे शहरास समान पाणीपुरवठा करण्याच्या संदर्भात केंद्र शासनाच्या वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनास दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ई) भामा-आसखेड योजनेच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसन व भरपाई रक्कमेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान योजनेंतर्गत रुपये ३८० कोटी किमंतीच्या प्रकल्पास राज्य शासनाने मान्यता दिली असून त्यापैकी एकूण रुपये ७६ कोटी पुणे महानगरपालिकेस वितरित करण्यात आले आहेत.

उ) पुणे शहराच्या हद्दीतील प्रस्तावित रिंगरोडसाठी शहरातील ३४ कि.मी. लांबीच्या एच.सी.एम.टी.आर. रस्त्याचा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे काम तज्ज्ञ सल्लागार मे.स्तूप कन्सल्टन्ट यांचे मार्फत सुरु करण्यात आले आहे.

सदर २४ मीटर रुंद रस्तामध्ये अंदाजे एकूण ६८ हेक्टर क्षेत्रापैकी १४ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

ऊ) राष्ट्रीय नदी कृती कार्यक्रमांतर्गत पुणे शहरात निर्माण होणा-या संपुर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणे ही रु.९९०.२६ कोटी अंदाजित खर्चाची योजना केंद्र शासनाने मान्य केली आहे. याबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे बैठक झाली असून त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून तज्ज्ञ सल्लागार (Principal consultant) नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मौजे वाघिवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील संपादित केलेल्या जमिनी सिडकोने सावकार कंपनीला बेकायदा विक्री केल्याबाबत**

**(११) * २६१११ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघिवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यापोटी सिडकोने साडेबारा टक्के योजनेंतर्गत सिडको प्लॉट नं. ३, ४, व ४-ए, सेक्टर नं. ३०/३१, मधील ५३ हजार चौ.मी. क्षेत्राची, संरक्षित कुळाची जमीन, संरक्षित कुळाचे हक्क डावलून, सिडकोने मुदंडा नामक सावकार कंपनीला १५० एकर जमीन विक्री करुन ६६ संरक्षित कुळांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ मार्च, २०१२ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या नगरविकास विभागाकडे दाखल केलेली याचिका मा.महसूल मंत्री यांचेकडे वर्ग करण्यात येवूनही, यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार फसवणूक करुन ताब्यात घेतलेली संरक्षित कुळांची जमीन कुळांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मौजे वाघिवली, जि.रायगड येथील मूळ जमीनधारक श्री.जुगलबक्ष हनुमानबक्ष मुंदरा व इतर यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी त्यांची साडेबारा टक्के योजनेंतर्गत पात्रता मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे बेलापूर नोडमधील सेक्टर क्र. ३०/३१ येथील टेकडी सदृश्य जागा जमीनधारक "जसे आहे तसे तत्वावर" घेण्यास तयार असल्याने सिडकोकडील लिंकेज समितीच्या मान्यतेने भूखंडवाटप केले आहे.

तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे समोरील सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. २८०/२०१२ मधील याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळताना मा.न्यायालयाने त्यांना प्रचलित कायद्यानुसार मार्ग अवलंबण्याचा पर्याय खुला ठेवल्याने याचिकाकर्त्याचा अर्ज महसूल व वन विभागास हस्तांतरीत करण्यात आला होता. तथापि, विचाराधीन जमिनीबाबत मा.मंत्री, महसूल यांनी दिनांक १/१०/२०१० च्या आदेशानुसार विनंती फेटाळली आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील मिळकतीबाबत अर्जदार यांनी मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन कायदा, १९४८ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडे दावा करणे आवश्यक आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हयाचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्याबाबत**

**(१२) * २६०३३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नुकतीच स्मार्ट सिटी योजना जाहिर करून त्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर इत्यादी जिल्हयाचा समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्हयाचा देखील स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियानांतर्गत देशातील १०० स्मार्ट सिटी शहारांपैकी प्रथम टप्प्यात पुणे व सोलापूर या २ शहरांची निवड स्पर्धात्मक पध्दतीने झाली.

तसेच, दुसऱ्या फेरीत कल्याण-डोंबिवली, नागपूर, नाशिक, ठाणे, औरंगाबाद या पाच शहरांची निवड झाली.

देशातील सर्वात जास्त स्मार्ट शहरे (सात) महाराष्ट्रातच आहेत.
(२) या अभियानांतर्गत स्पर्धात्मक प्रक्रियेत अकोला शहर पात्र ठरु शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयातील प्रत्येक गावात महिला दक्षता समित्या स्थापन करण्याबाबत**

**(१३) * २४६९५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात गावागावात ग्रामरक्षक दल स्थापन करावा तसेच शहरातील महिला दक्षता समित्या सारखीच गावागावात महिला दक्षता समित्या स्थापन करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पोलीस अधिक्षक, सांगली यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) सांगली जिल्हयातील प्रत्येक गावात ग्रामरक्षक दले स्थापन करण्यात आली आहेत.

- जिल्हयातील सर्व २५ पोलीस ठाणे स्तरावर महिला दक्षता समित्या स्थापन करण्यात आले असून, सदर समितीच्या सदस्या वेगवेगळया गावातील महिलांचे नेतृत्व करणाऱ्या जागरूक असणाऱ्यांची निवड करून महिला दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर समित्याचे मासिक बैठका संबंधित पोलीस ठाणेस्तरावर घेतली जाते. बैठकीमध्ये महिला व मुलींविषयी तक्रार असल्यास तात्काळ दखल घेवून कायदेशीर कारवाई केली जाते.
- जिल्हयात एकुण ७ निर्भया पथक तयार करण्यात आले आहे, निर्भया सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, निर्भया पथकाबाबत प्रसिध्दी देवून जनजागृती करण्यात आली आहे.
- शाळा कॉलेजमध्ये निर्भया तक्रार पेटी ठेवण्यात आल्या आहेत,

- सांगली जिल्हयातील ज्या पोलीस ठाणे हद्दीत रेल्वे पोलीस ठाणे व प्लॅटफार्म या ठिकाणी सीसीटीव्ही आहेत, त्या ठिकाणी सीसीटीव्ही फूटेज डिलीट न करता ते फुटेज स्वतंत्रपणे हार्ड डिस्क मध्ये साठवून वरिष्ठ कार्यालयात जमा करणेबाबत पत्रव्यवहार करीत आहोत,
- जिल्हयातील विविध शाळा व कॉलेजमध्ये महिला विषयक कायदे, महिलांना अधिकार याबाबत समूपदेशन करण्यात येते,
- स्कूल बसमध्ये बसचालकाच्या मदतीकरिता महिला कर्मचारी देण्याबाबत संबंधित शाळा, कॉलेज यांना पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे व एम.एम.कलबुर्गी यांच्या हत्येच्या तपासाबाबत**

**(१४) * २३७११ श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक दिवंगत डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे व एम.एम.कलबुर्गी यांच्या हत्येचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच तपासाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या संदर्भात डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५४/२०१३, भादंवि कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३ (२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपास दिनांक ०३/०६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे.

कॉ.गौंविद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्हयातील राजारामपुरी पोलीस ठाणे येथे दोन आरोपींविरूध्द गु.र.क्र.३९/२०१५ भादंवि कलम ३०२, ३०७, १२० (ब), ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३(१)/२५ (१ब) (अ), ५/२७ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर दोन्ही आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. तसेच

गुन्ह्यातील काही आरोपी फरार असून गुन्ह्याचा पुढील तपास सीआरपीसी १७३ (८) प्रमाणे चालू आहे. श्री.एम.एम.कलबुर्गी यांच्या हत्येचे प्रकरण हे कर्नाटक राज्याशी संबधित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील सीमावर्ती भागात सुमारे ५०० बेरोजगारांची रेल्वेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक**

**(१५) * २५८५९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील सीमावर्ती भागात सुमारे ५०० बेरोजगारांना रेल्वेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी हैद्राबाद येथील एका महिलेस बिलोली न्यायालयाने कोठडी सुनावली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील महिलेच्या इतर सहकाऱ्यांना अटक करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी नांदेड जिल्हयात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड गु.र.नं. ७४/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ३४.

२) पोलीस स्टेशन बिलोली गु.र.नं. ६८/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४.

३) पोलीस स्टेशन देगलुर गु.र.नं. २३२/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वरील गु.र.नं. ६८/२०१५ व गु.र.नं. २३२/२०१६ या गुन्हयात एक महिला आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तसेच गु.र.नं. ७४/२०१५ च्या गुन्हयात ३ आरोपी असून त्यांना अटकपूर्व जामिन मिळाला आहे. गु.र.नं. ६८/२०१५ बाबत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे व उर्वरित दोन गुन्हे तपासावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**मनोरा आमदारांच्या वसतिगृहाशेजारी समुद्रात इमारतीचे बांधकाम सुरु असल्याबाबत**

**(१६) * २३७३० श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोरा आमदारांच्या वसतिगृहाशेजारी भरसमुद्रात फक्त १० ते २० मीटरवर विक्री घटकाच्या इमारतीचे बांधकाम सुरु असल्याची बाब झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास (SRA) यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरसमुद्रात हे बांधकाम सुरु असल्याबाबत महाराष्ट्र सागरी हद्द व्यवस्थापन प्राधिकरणाने सागरी हद्दीचे उल्लंघन होत असल्याबाबत झो.पु.प्रा.कडे वेळोवेळी आक्षेप उपस्थित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सागरी हद्द व्यवस्थापन प्राधिकरणाने काम थांबविण्याचे वेळोवेळी आदेश दिलेले असतानाही स्थगिती आदेश का उठविण्यात आले,

(४) असल्यास, याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबईमधील नरिमन पॉईंट, बॅकबे रिक्लेमशन स्कीम-३ येथील सी.एस.क्र.१९८० भूखंड क्र. १५३ अे व १५० अे महात्मा फुले अे व बी या सहकारी गृहनिर्माण संस्थेला प्रथम दिनांक १५/११/२००७ रोजी आशयपत्र व त्यानंतर दिनांक २८/२/२००९ आणि दिनांक ६/४/२०१० रोजी सुधारीत आशयपत्रे दिली आहेत. यामधील भूखंड क्र. १५० अ वर करमणूकीच्या मैदानाचे आरक्षण आहे. या योजनतील विक्री घटकाच्या इमारतीस दिनांक १९/१/२०१३ रोजी जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी दिली आहे त्यानुसार बांधकाम सुरु आहे.

(२) व (३) पर्यावरण विभागाच्या अहवालानुसार केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १७/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये भू.क्र.१९८० (पैकी) फोर्ट भू.क्र. १५३ पैकी बॅकबे रिक्लेमेशन स्किम-III नरीमन पॉईंट मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रकल्पाला सि.आर.झेड अधिसुचना, १९९१ अंतर्गत परवानगी देण्यात आली आहे.

सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रकल्पाबाबत महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प प्रर्वतकाला प्रकरणाचे निराकरण होईपर्यत बांधकाम थांबविण्याचे निर्देश देण्यात आले. सदर विषय महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १५ मे, २०१२ व ३० जुलै, २०१२ रोजी झालेल्या ७५ व ७६ व्या बैठकीत विचारार्थ घेण्यात आला होता. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दिनांक १/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये फक्त पुनर्वसन इमारतीचे बांधकाम थांबविण्याचे निर्देश मागे घेण्यात आले.

महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पुन:श्च सदर प्रकरणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक १८/६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये वरील विषयावर स्पष्टता नसल्याचे कळविले होते. त्यानुसार सदर प्रकरण महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १९/७/२०१४ रोजी झालेल्या ९२ व्या बैठकीत विचारार्थ घेण्यात आले होते. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, उपसमितीने दिनांक २९/१०/२०१४ रोजी केलेल्या स्थळ पाहणी अहवालाची महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक २४ ते २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या ९४ च्या बैठकीत नोंद घेण्यात आली.

तद्नंतर सदर प्रकरण महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीत घेण्यात आले सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

अ) सेस, केरळ यांनी तयार केलेल्या सि.आर.झेड नकाशातील काल्पनिक रेषा सुचित करण्यासाठी प्रस्तावित जागेवर खांब रोवण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना निर्देश देण्यात यावे.

आ) दिनांक १६/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प प्रर्वतकाला प्रकरणाचे निराकरण होईपर्यंत बांधकाम थांबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर निर्देश दिनांक १/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आले. सदर दिनांक १/१०/२०१२ रोजीचे आदेश हे संपूर्ण झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रकल्पात लागू राहतील.

त्यानुसार ९७ व्या बैठकीत झालेला निर्णय दिनांक ५/३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविण्यात आले. त्याप्रमाणे प्राधिकरणाने दिनांक १७/४/२०१५ च्या पत्रान्वये विक्री घटकाच्या इमारतीच्या बांधकामावरील स्थगिती उठविली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात गोरगरीब लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकूल मिळवून देण्याचे आमिष दाखवून दलाल त्यांच्याकडून पैसे घेत असल्याबाबत**

**(१७) * २४७१५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यासह राज्यात गोरगरीब लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकूल मिळवून देण्याचे आमिष दाखवून दलाल त्यांच्याकडून पैसे घेत आहेत, तर त्याचवेळी शासनाचा महसूलही बुडविला जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेतील दलालखोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) सर्वासाठी घरे-२०१२ या अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार सदर योजना ४ घटकात नागरी भागात राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये १४२ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेतील प्रकल्पांवर देखरेख व संनियंत्रण करण्याकरिता अभियान संचालक, राज्य अभियान संचालनालय, प्रधानमंत्री आवास योजना यांची तसेच या योजनेतील विविध घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता उपाध्यक्ष, म्हाडा यांना राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण (Nodal Agency) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) नवी

दिल्ली यांनी विविध बैठकीत ४३ प्रकल्पांना तत्वत: मान्यता दिली आहे. राज्यात सदर योजना स्थानिक नागरी स्वराज्य संस्थामार्फत राबविण्यात येत असून प्रधानमंत्री आवास योजनेतून लाभार्थींना घरकुल मिळवून देण्याचे अमिष दाखवून दलाल लाभार्थ्यींना घरकुल मिळवून देण्याचे आमिष दाखवून दलाल लाभार्थीकडून पैसे घेत असल्याबाबतची कोणतीही तक्रार नागरी स्वराज्य संस्थाकडून प्राप्त झालेली नाही.

-----------------

**मुंबईतील महामार्गावरील अपघात रोखण्याबाबत**

**(१८) * २५५१८ श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महामार्गावर गत सात महिन्यात ८५ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई शहरात महामार्गावर सन २०१६ मध्ये गत सात महिन्यात ८३ जणांचा मृत्यू झालेला आहे.

(२) सदर मृत्यू हे पादचाऱ्यांच्या चुकीमुळे, वाहनातील तांत्रिक बिघाडांमुळे व इतर कारणांमुळे उद्‌भवलेल्या अपघातांमुळे झालेले आहेत. मुंबई वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रात पश्चिम द्रुतगती महामार्ग व पूर्व द्रुतगती महामार्ग यांचा समावेश होतो.

महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

i) अपघात प्रवणस्थळी सूचनाफलक तसेच रात्रीच्या वेळी वाहनचालकांच्या दुरुन नजरेस येतील असे फ्लूरोसेंट सूचनादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.

ii) महामार्गावर डिव्हायडर व पुलाचे कठडे दिसावेत याकरीता त्यावर रेडीयम पट्ट्या व रिफ्लेक्टर लावण्यात आलेले आहे.

iii) महामार्गावरील रस्त्यावर रात्री अपघात होऊ नये याकरीता स्ट्रीटलाईट लावण्यात आलेले आहेत.

iv) रस्त्यावर येणाऱ्या मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी जंक्शनच्या ठिकाणी लोखंडी बॅरीकेटस् लावून दक्षता घेण्यात येते.

v) मोटरसायकल चालकांना हेल्मेटचा वापर करणे आवश्यक असल्याबाबत शाळा कॉलेज व इतर ठिकाणी जनजागृती करण्यात येते.

vi) दारु पिऊन वाहन चालवणाऱ्या वाहनचालकांवर ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह मोहिम वेळोवेळी राबवून कारवाई करण्यात येते.

vii) जंक्शनच्या मध्यभागी हॅलोजन लाईटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

viii) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालक व मालक यांच्यावर जरब बसवण्यासाठी “सीसीटीव्ही चलन” कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

ix) बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्यांवर वेळोवेळी मोटरवाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

x) प्रत्येक चौकात वाहतूक पोलीस अंमलदार यांची वाहतूकींचे नियमन करण्यासाठी नेमणूक करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शाळांबाहेर अंमलीपदार्थ व हुक्का पेनची सर्रास विक्री होत असल्याबाबत**

**(१९) * २४४५७ श्री.प्रकाश गजभिये** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळेच्या बाहेर हुक्का पेनच्या विक्रीसाठी विविध ऑनलाईन साईट उपलब्ध असून दिड ते अडीच हजार रुपयाचे विविध स्वादाचे पेन बाजारात उपलब्ध झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हुक्का पेन मुळे विद्यार्थ्यांमध्ये वाईट सवई वाढण्याचे प्रमाण वाढलेले असून ते गुन्हेगारीकडे वळत आहेत, ह्या पेनमध्ये एल.इ.डी इंडीकेटर व मायक्रोप्रोसेसर बसविण्यात आलेले असते, सिगारेट प्रमाणे हे पेन पान ठेले, सार्वजनिक दुकानामध्ये हे बॅटरीवर चालणारे पेन व निकोटीन, गांजा व अंमली पदार्थांचे लिक्वीड ह्या पेनमध्ये भरलेले असते, ह्यामुळे पिल्यास नशा येते, हे पेन सर्वत्र विकत मिळतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर त्वरीत प्रतिबंध घालण्यास शासन काही उपाययोजना करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, राज्यात मुलांमध्ये ड्रग्जबाबत जागृती निर्माण करण्यासाठी शासनाने विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. अंमली पदार्थ विरोधात शाळा/महाविद्यालये इत्यादी ठिकाणी तसेच सार्वजनिक उत्सवामध्ये (उदा.दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव) तसेच अंमली पदार्थ विरोधी पंधरवडयात सामाजिक संस्थांच्या मदतीने विविध कार्यक्रमाद्वारे जनजागृती केली जाते. तसेच वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांवर उपचार करण्यात येतात. २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवाडा साजरा करण्यात येतो. यावर्षी सदर पंधरवाडयात अंमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत माहिती देण्यात आली व जनजागृती निर्माण होण्यासाठी बिकेसी या ठिकाणी एन.सी.बी.च्या सहकार्याने मॅरेथॉन शर्यतीचे आयोजन करण्यात आले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील डेब्रीज गैरव्यवहाराबाबत

**(२०) * २३८९२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेतील डेब्रीज गैरव्यवहाराबाबत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप-आयुक्त (परिमंडळ-५) यांनी सदर कामांवर देखरेख ठेवणारे सहाय्यक अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) व सदर कामाचे देयक पारित करणारे लेखा अधिकारी यांची चौकशी करण्यासाठी आदेश दिले होते, सदर चौकशी पूर्ण झालेली असून सुध्दा चौकशीच्या आधारे दोषींवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत १५० कोटी रूपयांच्या वसूलीबाबत अंतिम चौकशी अहवाल प्राप्त झालेला असताना सुध्दा आर्थिक व्यवहारापोटी ही कार्यवाही थांबविण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) संबंधित अधिकाऱ्यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली असून अद्याप सविस्तर चौकशीची कार्यवाही झालेली नाही.

(३) सदर प्रकरणी अंतिम चौकशी अहवाल प्रलंबित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे खाडीतून अंतर्गत जलवाहतूक सुरु करण्याबाबत**

**(२१) * २६१४९ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडीतून अंतर्गत जलवाहतूक सुरु करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-मीरा-भाईंदर-ठाणे कोलशेत, घोडबंदर रोड, साकेत-दिवा, भिवंडी-कल्याण असा जलवाहतूक मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठाणे खाडीतून जलवाहतूक प्रस्तावित प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) याबाबतचा प्राथमिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यात आला असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार संस्था नेमण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच प्रकल्प सल्लागार नेमण्यासाठीच्या अटी/शर्ती अंतिम करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने प्रस्ताव इनलँड वॉटरवेज ऑथेरिटी ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर तांत्रिकदृष्ट्या जलवाहतूक सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) हेक्स वर्ल्ड गृहप्रकल्पातील गुंतवणूकदारांची कंपनीने फसवणूक केल्याबाबत**

**(२२) * २३५५५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हेक्स वर्ल्ड गृहप्रकल्पामध्ये सन २००८ पासून सुमारे २००३ गुंतवणूकदारांनी पैसे गुंतविले असतानाही अद्याप त्यांना हक्काची घरे न मिळाल्याने सदरहू गुंतवणूकदारांची या कंपनीने फसवणूक केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानूसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

तळोजा गावातील (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हेक्स वर्ल्ड गृहप्रकल्पामध्ये सन २००८ पासून सुमारे २३४४ गुंतवणूकदारांनी पैसे गुंतविले असतानाही अद्याप त्यांना हक्काची घरे न मिळाल्याने सदरहू गुंतवणूकदारांची मे.देविशा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने फसवणूक केल्याची बाबत माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरून पाच आरोपीविरूध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गु.र.न.६९/२०१५ भांदवि कलम ४२०, ४०६, १२० ब सह महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅटस कायदा कलम ३, ४, ५, ८, १३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांचेविरूध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पनवेल न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर शहरातील रस्ते कॉंक्रेटीकरण करणेबाबत**

**(२३) * २६०३९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर या शहरात वर्षातून चारवेळा भरणा-या वारीकाळात लाखो भाविक विठ्ठल दर्शनासाठी येत असतात तसेच वारी काळात शहरातील रस्त्यातील खड्डे माती टाकून बुजविण्याचे काम चालू असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तयार केलेले रस्ते, बुजविलेले खड्डे निकृष्ट दर्जाचे आहेत म्हणून मुख्याधिकारी, नगरपालिका पंढरपूर यांनी ठेकेदारांना नोटीस काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर हे शहर काळ्या मातीत वसलेले असल्याने रस्त्यांचे डांबरीकरण करण्याऐवजी सिमेंटचे रस्ते बांधण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पंढरपूर शहरात प्रत्येक वारीच्या अगोदर रस्ते खराब झाले असल्यास ते खडी व डांबराच्या सहाय्याने पूर्ववत केले जातात.
(२) पंढरपूर नगरपरिषदेने डांबरीकरणाचे काम खराब झाल्यामुळे ते काम पुर्ववत करून द्यावे अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी ठेकेदारास नोटीस बजावली आहे.
(३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (राज्यस्तर) अंतर्गत पंढरपूर शहरातील वेगवेगळया ८ कॉंक्रिट रस्त्यांच्या रूपये ५२.६८ कोटीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असुन दिनांक १५/१०/२०१६ पासून कामास प्रत्यक्ष सुरूवातही झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव महानगरपालिकेतील डिझेल खरेदीतील गैरव्यवहाराबाबत

**(२४) * २६३२३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेच्या आरोग्य, बांधकाम व अतिक्रमण विभागात सुमारे १५८ वाहने असून सदर वाहनासाठी महानगरपालिकेला डिझेल पुरवठा करावा लागतो, दररोज सुमारे ७०० लिटर डिझेल तर महिन्याला २४००० लि. सुमारे २ टँकर डिझेल लागते. परंतु, गेल्या काही दिवसात प्रशासनाकडून डिझेल खरेदीबाबत परवानगी घेतली जात नसल्याने यात गैरव्यवहार झाला असून डिझेल रिक्षा चालकांना रुपये ४० किंवा ५० प्रतिलिटर भावाने अवैधरित्या विकले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या डिझेल विकत घेण्यास रिक्षा चालकांनी दुजोरा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जळगाव महानगरपालिकेकडे एकूण १८८ वाहने असून त्यापैकी ४६ वाहने कालबाह्य व १४२ वाहने कार्यरत आहेत. त्यापैकी आरोग्य, बांधकाम व अतिक्रमण विभागात एकूण ११३ वाहने आहेत.

या सर्व वाहनांसाठी दैनंदिन डिझेल वाटप करतेवेळी वाहन चालक व संबंधित विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार दररोज सुमारे १००० ते १२०० लिटर डिझेल वाटप करण्यात येते.

इंधन खरेदीसाठी महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येते.

स्थायी समितीमध्ये सदर डिझेल खरेदी मंजुरी व वापराबाबत महानगरपालिका सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्याने याबाबत महानगरपालिकेमार्फत चौकशी समिती दिनांक १६/९/२०१६ च्या आदेशान्वये नेमण्यात आली असून, सदर चौकशीचे काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेतील गैरप्रकाराबाबत**

**(२५) * २४५२३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेतील गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदार, अधिकारी यांची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सदस्य सचिवांनी शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अहवालात काय नमूद करण्यात आले आहे, तसेच या गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदार व अधिकारी यांच्याविरूध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, परभणी शहरवासियांना पुरेसा पाणी पुरवठा मिळवून देण्यासाठी शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

युआयडीसएसएसएमटी योजनेंतर्गत परभरणी शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेस्तरावर चौकशी करण्याबाबतच्या सूचना जून, २०१६ मध्ये देण्यात आल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) सदर चौकशी अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणी चौकशी पूर्ण करून अहवाल दोन आठवड्यात सादर करणेबाबत निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आले आहेत.

-----------------

**नाशिक विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सेवा सुरु करणेबाबत**

**(२६) * २४३४३ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९५१२ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे दोन वर्षापासून विमानतळाची सुसज्ज इमारत तयार असूनही माहे आक्टोबर, २०१६ पर्यंत प्रवाशी सेवा सुरु झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमान कंपन्यांची सेवा शुल्क माफीची मागणी शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे सदर विमानतळावरील विमानांचे उड्डाण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणांतर्गत शासनामार्फत "Regional Connectivity Scheme" योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत राज्यातील विमानतळांचा विकास करण्याचे नियोजित असून त्यामध्ये नाशिक विमानतळाचा समावेश आहे. या योजनेंतर्गत विमानतळ कार्यान्वित करण्यासाठी सेवाशुल्क, विमानसेवेचा प्रत्यक्ष खर्च व अपेक्षित महसूलातील तफावत दूर करणे याकरीता VGF (Viability Gap Funding) करण्याचे नियोजित असून या निधीमध्ये केंद्र शासनाचा ८०% व राज्य शासनाचा २०% याप्रमाणे हिस्सा ठेवण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील जुने वाडे निष्कासित करण्यापूर्वी रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत

**(२७) * २४७४५ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने येथील जुन्या वाड्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले असता त्यामध्ये २०१ वाडे धोकादायक असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाड्यांवर कार्यवाही करण्याआधी येथील रहिवाशांच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुन्या धोकादायक/मोडकळीस आलेल्या इमारती/वाड्यांचे सर्वेक्षण करण्यात येत असून, त्यांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार अतीधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे या प्रवगातील (सी-१) एकुण ३८४ मिळकती आढळून आल्या असून त्यापैकी एका झोन (क्र.७) मध्ये २०१ वाडे आढळलेले आहेत.

(२) पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती निष्कासित करण्यापूर्वी रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात येते.

खाजगी मालमत्तांवर/जुन्या वाड्यांवर कारवाई करण्याआधी तेथील रहिवाशांची राहण्याची पर्यायी व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यात येत नाही.

तथापि, रहिवाशांचे हक्क अबाधित रहावे या दृष्टीकोनातून सदरच्या धोकादायक/मोडकळीस आलेल्या इमारती/वाडे रिकामे करण्यापूर्वी त्यामधील रहिवाशांच्या ताब्यात असलेले चटई क्षेत्र मोजून त्यानूसार त्यांना तसे प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन (मुंबई) येथे पर्यावरणाच्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(२८) * २४९१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन रुग्णालयात शवागाराची दुरवस्था व रक्तमिश्रीत पाणी गटारात सोडून पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याच्या मुद्यावरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणाच्या नियमांची अंमलबजावणी न केल्यास रुग्णालयावर खटला दाखल करण्यात येईल असा इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इशाऱ्याची दखल घेत रुग्णालयात पर्यावरणाच्या नियमांशी संबंधित गंभीर त्रुटी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) लोकमान्य ठिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयात पर्यावरण संबंधित नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारची काळजी नियमित घेण्यात येते. तसेच काही त्रुटी आढळल्यास तत्परतेने त्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

-----------------

**तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथे सहा वर्षीय बालिकेवर अत्याचार झाल्याबाबत**

**(२९) * २३६८३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथे सहा वर्षीय बालिकेवर बलात्कार झाल्याची घटना दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ आर्थिक परिस्थिती नसल्याने पिडीत मुलीला उपचार मिळू शकले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) नाही.

पिडीत मुलीवर प्राथमिक आरोग्य केंद्र नळदुर्ग व सरकारी दवाखाना उस्मानाबाद येथे उपचार करण्यात आले आहे.
(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन नळदुर्ग गुरनं.२०७/२०१६ कलम ३७६(i) भादंवि सह कलम ४, ८ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी विधी संघर्ष बालकास ताब्यात घेऊन मा.बाल न्यायालयाच्या आदेशाने पालकाच्या ताब्यात देण्यात आले. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दिनांक २२/११/२०१६ रोजी मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी उद्यानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * २४४२२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील सिध्दार्थ कॉलनी व आचार्य नगर यांच्यामध्ये असणाऱ्या सर्व्हिस रोडच्या बाजूला आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी उद्यानाची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्यानात दगड-मातीचा भराव टाकल्याने जमिनीची पातळी एकसमान नसल्याने ज्येष्ठ नागरिकांना फेरफटका मारता येत नसून लहान मुले खेळतांना पडून जखमी होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उद्यानाच्या आजूबाजूला अनधिकृत बांधकामे असून त्यामुळे संरक्षक भिंत कमकुवत होत असल्याने या उद्यानांचे सुशोभिकरण करुन संरक्षण भिंतीला लागून असलेले अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) चेंबूर (मुंबई) येथील न.भु.क्र. ४७० (भाग) चेंबूर गाव या शासनाच्या भूखंडावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी उद्यान विकसित केले आहे.

पुन: मंजुर विकास आराखडा १९९४ नुसार मैदानासाठी किंवा करमणुकीच्या मैदानासाठी अथवा उद्यानासाठी आरक्षित नाही. तसेच मसुदा विकास आराखडा २०३४ (मे, २०१६) मध्ये देखील या भूखंडावर उपरोक्त आरक्षण नाही.

तथापि, उद्यानाच्या दुरवस्थेबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या ना-हरकत परवानगीने निधीच्या उपलब्धतेनुसार व प्राधान्याने दुरुस्तीची कामे महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येतील.

जमिनीची पातळी एकसमान नसल्याबाबतची तक्रार प्राप्त होताच वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दगड, मातीचा भराव टाकून जमिनीची पातळी एकसमान केली जाते. जेणेकरुन जेष्ठ नागरिक व लहान मुलांना त्रास होणार नाही.

(३) व (४) सदर ठिकाणी उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), चेंबूर यांच्या कार्यालयामार्फत दिनांक ३०/०९/२०१६ रोजी न.भू.क्र. ४७० (भाग) वरील संरक्षित भिंतीला लागून असलेली अनधिकृत बांधकामे निष्कासनाची कारवाई महानगरपालिकेच्या मदतीने पार पाडण्यात आली. सद्यस्थितीत या भूखंडावर अतिक्रमण असल्याची कोणतीही तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

----------------

## मुंबईतील महापालिकेच्या बऱ्याच शाळांसह खासगी शाळा व महाविद्यालयांच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थांच्या होणाऱ्या विक्रीस प्रतिबंध घालणेबाबत

**(३१) * २५३६४ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिकेच्या बऱ्याच शाळांसह खासगी शाळा व महाविद्यालयांच्या आवारात पान, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा अशा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तंबाखू नियंत्रण कायदा लागू करुनही त्याची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दिपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेवगाव (जि.अहमदनगर) वरुर बुद्रुक येथील आंबेडकर चौथऱ्यावर झेंडा उभारल्यामुळे लोकांनी दलित समाजावर बहिष्कार घातल्याबाबत**

**(३२) * २५१०७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेवगाव (जि.अहमदनगर) वरुर बुद्रुक येथील आंबेडकर चौथऱ्यावर झेंडा उभारल्यामुळे लोकांनी दलित समाजावर बहिष्कार घातल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) तथापि, वरुर गावात ग्रामपंचायतच्या मालकीच्या समोर मोकळया जागेत परवानगीशिवाय निळा, भगवा, पिवळा, हिरवा असे वेगवेगळया रंगाचे झेंडे लावण्यात आले होते. पोलीस प्रशासनाने सदर ठिकाणचे झेंडे काढण्याकरीता प्रयत्न करुनही झेंडे काढण्यात आले नाहीत. दिनांक १८/०८/२०१६ रोजी तहसील कार्यालय शेवगाव येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, वरुर बुद्रुक गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, दलित व सवर्ण समाजाचे प्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. सर्व संमतीने झेंडे काढत असल्याबाबतचा ठराव करण्यात आला. त्याअनुषंगाने दिनांक २०/०८/२०१६ रोजी झेंडे काढण्यात आले असून, दरम्यानच्या कालावधीत कुठलाही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. सदर ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण शहरात शासन आदेशाचे उल्लंघन करून अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम केल्याबाबत

**(३३) * २४३१९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरातील शिवाजी चौक ते पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ या कार्यालयापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांच्या समोरील जागा रस्ता रुंदीकरणाकरिता संपादित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संपादित केलेल्या जागेच्या बदल्यात दुकानदारांना निष्कासित केलेल्या जागेपेक्षा दुकानावर एक ते दोन मजले बांधण्याकरिता महापालिकेच्या नगररचना विभागाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त महापालिकेच्या नगररचना विभागाच्या मंजूरी आदेशाची पायमल्ली करुन रस्ता रुंदीकरणाकरिता बाधित झालेल्या दुकानदारांनी दुकानावर अनधिकृतपणे अतिरिक्त मजले बांधल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

कल्याण शहरातील शिवाजी चौक ते पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ या कार्यालयापर्यंत हा अस्तित्वातील रस्ता विकास योजना आराखड्यातील नियोजित रुंदीप्रमाणे म्हणजेच १८.०० मी. विकसित करण्याकरीता रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांचा सदरहू रस्त्याच्या आखणीने बाधित भाग तोडण्यात आला व जागा ताब्यात घेऊन रस्ता विकसित करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही,

उक्त ताब्यात घेतलेल्या जागेच्या बदल्यात दुकानदारांना उर्वरित दुकानावर एक ते दोन मजले बांधण्याकरीता नगररचना विभागाने मंजूरी दिलेली नाही.

रस्ता रुंदीकरणामुळे बाधित झालेल्या काही धारकांचे महानगरपालिकेच्या पुनर्वसन धोरणानुसार पुनर्वसन समितीमार्फत पुनर्वसन करण्यात आले आहे.

याखेरीज बाधित जमीनधारकांना बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ नुसार मोबदल्याचे पर्याय देण्यात आले आहेत. मात्र संबंधितांकडून असा प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाला नसल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) काही मिळकत धारकांनी महानगरपालिकेच्या नगररचना विभागाची दुरुस्ती परवानगी घेवून दुरुस्ती केली आहे. तर काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणामुळे बाधित झालेल्या दुकानदारांनी महानगरपालिकेची परवानगी न घेता, वाढीव बांधकाम केले आहे.

महानगरपालिकेची परवानगी न घेता, वाढीव बांधकाम केलेल्या बांधकामांच्या बाबतीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून पाहणी करण्यात आली व संबंधित बांधकाम धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६० अन्वये नोटीस देऊन सुनावणी घेण्यात आली आहे.

या सुनावणी दरम्यान बांधकाम धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करुन व याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन पुढील कारवाई प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी नगर वाचनालयाला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने अमान्य केल्याबाबत**

**(३४) * २५७३५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ७८२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी नगर वाचनालयाला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव नगरपरिषदेने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नाकारण्यासंबंधीचा नगरविकास खात्याने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून मागितलेला अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, त्या अहवालात नगरपरिषदेच्या वाचनालयाला दिलेल्या जागेसंबंधी काय माहिती देण्यात आलेली आहे, त्याअनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झालेला आहे.

(२) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांच्या अहवालात खालील बाबी नमूद केल्या आहेत.

- i) नगरवाचनालयाची इमारत व्यापारी तत्वावर भाडेपट्ट्याने दिलेली असल्याचे निदर्शनास आल्याने भाड्यापोटी जमा झालेली रक्कम नगरवाचनालय व्यवस्थापनाने नगरपरिषदेकडे जमा करावी.
- ii) नगरवाचनालयाची इमारत ही तीन मजली असून तळमजला वाचनालयाकरीता वापरण्यात येतो व दुसरा व तिसरा मजला व्यापारी तत्वावर भाड्याने दिल्याचे दिसून येते याकरीता इमारतीचा दुसरा मजला व तिसरा मजला नगरपरिषदेच्या ताब्यात दिला पाहिजे.
- iii) वाचनालयामध्ये सुमारे ४००० सदस्य तसेच सुमारे १५० दैनंदिन वाचक असल्याचे दिसून येते यामुळे वाचनालयाच्या उद्देशाकरीता नगरवाचनालयाच्या तळमजल्याच्या जागेकरीता मुदतवाढ देणे शक्य आहे.

वरील अहवालावरुन प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय विचाराधीन जागा विहीत कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतूदीनुसार तपासून त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथे पोलिसांसाठी १० हजार घरे उभारण्याच्या निर्णयाबाबत

**(३५) * २४९६० श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे पोलिसांसाठी उभारावयाच्या गृहनिर्माण सोसायट्यासाठी २ एफएसआय देऊन १० हजार घरे उभारण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुख्य प्रवर्तक, बृहन्मुंबई पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी मौ.वयाळ, ता.खालापूर येथील जमिनीवर त्यांच्या पोलीस हौसिंग प्रकल्पाकरिता २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची विनंती शासनास दिनांक ६/६/२०१६ च्या पत्रान्वये केली आहे. तद्नंतर उक्त अर्जदार संस्थेने पुन्हा दिनांक २१/११/२०१६ च्या पत्रान्वये त्यांचे उक्त जमिनीस विशेष नगर वसाहत प्रकल्पाचा दर्जा प्रदान करुन २.०० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची विनंती शासनास केली आहे. सदर विनंती अर्जावर शासन स्तरावरुन प्राथम्याने कार्यवाही करणेत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांच्या शाळांना व्यापारी ऐवजी निवासी दराने कराची आकारणी करणेबाबत**

**(३६) * २३६७३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८७४८ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बृहन्मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपुर आणि औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांच्या शाळांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुर महानगरपालिका क्षेत्रातील धर्मादाय/शासकीय अनुदानित शाळा वगळुन इतर सर्व शाळांना मालमत्ता कर निवासी दराच्या दुप्पट दराने आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच मराठी माध्यमाच्या मान्यता प्राप्त अनुदानित शाळा/महाविद्यालयांना किमान निवासी दराने कराची आकारणी व्हावी अशी मागणी शैक्षणिक संस्थांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

काही महानगरपालिकांकडे निवासी दराने कराची आकारणी व्हावी अशी मागणी शैक्षणिक संस्थांकडून करण्यात येत आहे.

(४) सदर बाब तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई पोलीस दलातील काही अधिकारी, डॉक्टर यांची फसवणूक झाल्याबाबत**

**(३७) * २३८४१ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुंतवणूकीच्या रक्कमेवर १८० टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून मुंबई पोलीस दलातील काही अधिकारी, डॉक्टर यांची सुमारे ७०० ते १००० कोटीची फसवणूक करून श्री.मोहनप्रसाद श्रीवास्तव व त्यांचे कुटुंब फरार झाले असून माहिम येथील डॉक्टर केदार गानला यांनी केलेल्या तक्रारीवरून हे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीवास्तव कुटुंबिय उत्तर प्रदेशात पळून गेल्याची प्राथमिक माहिती तसेच त्यांच्या रॅकेटद्वारे गुंतवणूकदारांने सुमारे ७०० ते १००० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत पोलिसांचा संशय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषदेचे अध्यक्ष श्री.मोहन कृष्णन यांनी गुंतवणूकदारांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सविस्तर निवेदन सादर करुन याप्रकरणी आर्थिक गुन्हे विरोधी विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणात आरोपी यांनी एकूण रुपये २०,५८,२५,०००/- चा गैरव्यवहार केला असल्याचे जबाबात नमूद असून आरोपींचे कुटुंब हे मुंबईमध्ये असल्याचे तपासादरम्यान दिसून आले आहे.

(३) व (४) या प्रकरणी वनराई पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२२३/१६ कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (ब) भा.दं.वि. सह कलम ३, ४ एमपीआयडी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा तात्काळ आर्थिक गुन्हे विभागाकडे गु.र.क्र. ७३/२०१६ अन्वये पुढील तपासाकामी वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उच्च माध्यमिक अभ्यासक्रम (HSC Vocational) या शैक्षणिक अर्हतेचे विद्यार्थी केंद्रीय संरक्षण खात्यातील अनेक पदांसाठी अपात्र ठरत असल्याबाबत**

**(३८) * २५६९२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक अभ्यासक्रम (HSC Vocational) या शैक्षणिक अर्हतेला केंद्र शासनाचे संरक्षण खाते उच्च माध्यमिक विज्ञान, वाणिज्य आणि कला शैक्षणिक अर्हतांशी समकक्ष मानत नसल्याने संरक्षण खात्यातील अनेक पदांसाठी हे विद्यार्थी अपात्र ठरले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, पूरक व क्रमिक साहित्य देणे, नविन अभ्यासक्रमांचा समावेश ॲप्रेंटिसशिप ॲक्टमध्ये करणे, शिक्षकांना उचित वेतन श्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, सदर अभ्यासक्रमाला अनुदान देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतील जुने अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार निश्चित केल्यानुसार सुधारित करण्यात आलेले आहेत. जुन्या ३० व्यवसाय अभ्यासक्रमांपैकी २८ व्यवसाय अभ्यासक्रमांचा समावेश ॲप्रेंटिसशिप ॲक्टमध्ये करण्यात आलेला होता. परंतु नविन पुनर्रचित व्यवसाय अभ्यासक्रमानूसार काही व्यवसाय अभ्यासक्रम एकत्रित करून ३० ऐवजी २० नविन पुनर्रचित व्यवसाय अभ्यासक्रम तयार करण्यात आलेले आहेत. त्या अभ्यासक्रमांचा समावेश ॲप्रेंटिसशिप ॲक्टमध्ये करणेबाबत Central

Apprenticeship Concil (CAC), नवीन दिल्ली यांना संचालनालयास्तवरून कळविण्यात आले असून सदर कार्यवाही संचालनालयास्तरावर चालू आहे. व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षकांना शासनाच्या निश्चित केलेल्या धोरणानुसार योग्य वेतनश्रेणी देण्यात येत आहे.
(३) व (४) अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई-गोवा या जलमार्गावर कोकण बोट जलवाहतुक सुरु करण्याबाबत

**(३९) * २३५६६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा या जलमार्गावर पुन्हा जलवाहतुक सुरु करण्याचा निर्णय जल वाहतूक मंडळ समितीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानूसार या जलमार्गावरील प्रवासी वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडून फिजिबिलिटी रिपोर्ट, रजिस्ट्रेशन सर्टिफिकीट व अन्य आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत काय, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) मुंबई, गोवा व महाराष्ट्र किनारपट्टीवरील लहान बंदरातून प्रवासी वाहतूक सुरु करण्यासाठी काही उद्योजकांनी प्रस्ताव सादर केले असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. त्याअनुषंगाने मे.सुवर्णदुर्ग शिपींग ॲन्ड मरीन सर्व्हिसेस यांना मुंबई-दिघी-दाभोळ-जयगड या जलमार्गावर पर्यटन बोट (Cruise) सुरु करणेस परवानगी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुर्भे (मुंबई) येथील क्षेपणभूमी हटविण्याबाबत

**(४०) * २४७७७ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुर्भे (मुंबई) येथील क्षेपणभूमीत सन २००४ पासून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नसून या परिसरातील नागरिकांना वायु प्रदुषणाचा त्रास होत असून त्यांनी हे क्षेपणभूमी हटविण्याबाबत महापालिकेवर मोर्चा काढला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर क्षेपणभूमी हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

नवी मुंबई महानगरपालिकेचे डंपिंग ग्राऊंड नसून राज्य शासनाने हस्तांतरीत केलेल्या तुर्भे येथील ६५ एकर जागेवर नवी मुंबई महानगरपालिकेने सन २००५ मध्ये शास्त्रोक्त पद्धतीने क्षेपणभूमी विकसीत केली आहे.

क्षेपणभूमीवर येणाऱ्या दैनंदिन घनकचऱ्यावर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात प्रक्रिया करुन त्यापासून खत, फ्युएल पॅलेट्स, प्लास्टिक पासून ग्रॅनुअल तयार करुन उरलेले रेसीड्युची विल्हेवाट सॅनीटरी लँडफील सेलमध्ये केली जाते. नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० नुसार तंतोतंत पालन करुन शास्त्रोक्त पद्धतीने घनकचऱ्याची विल्हेवाट करण्यात येते.

या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे कामकाज आय.आय.टी., मुंबई व NEERI या शासकीय मानद संस्थांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. सदर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी अधिकृततेचा दर्जा दिला असून त्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत आहे. घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या परिसरातील नागरीकांना वायु प्रदुषणाचा त्रास होत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हा न्यायालयातील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याबाबत**

**(४१) * २५६७० श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शिवाजीनगर जिल्हा न्यायालयातून खुनाच्या गुन्हयातील आरोपी फरार होणे, कोर्ट रुम मधून फाईल्स चोरीला जाणे, दुचाकी चोरीला जात असून सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे बार असोसिएशन तर्फे न्यायालयाच्या आवारात सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याकरिता वेळोवेळी मागणी करुनही शासनाने त्यांची मागणी मान्य न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

अ) पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील शिवाजी नगर जिल्हा न्यायालयाच्या आवारातून खूनाच्या गुन्ह्यातील एक आरोपी न्यायालयातील गर्दीचा फायदा घेऊन पळून गेला. याबाबत सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.न.२७६/२०१६ भादंवि क्र. २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीचा शोध घेऊन त्यास खराडी बायपास रोड येथे दिनांक १७/१०/२०१६ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे व गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

ब) जिल्हा न्यायाधीश कोर्ट रुम मधून एका अज्ञात व्यक्तीकडून फाईल्स चोरीला गेल्याबाबत शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.न.२५३/२०१६ भादंवि क्र. ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

क) एका अज्ञात व्यक्तीकडून न्यायालयाच्या आवारातून वाहन चोरी केल्याबाबत या तिन्ही प्रकरणी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.न.२५५/२०१६ भादंवि क्र.३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शिवाजीनगर न्यायालय येथे चार गेट असून न्यायालयाच्या सुरक्षितेकरीता पुढीप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेली आहे.

१) गेट क्र. १ आऊट गेट येथे दररोज ६ कर्मचारी नेमण्यात येतात त्यापैकी एक एस.एल.आ.धारी ५० राऊंडसह, एक मिरर, एक एच.एच.एम.डी, वॉकीटॉकी सुरक्षेकरीता देण्यात आली आहे.

२) गेट क्र. २ हे कायमस्वरुपी बंद असले तरी तेथे सुरक्षेसाठी १ कर्मचारी नेमण्यात आला आहे.

३) गेट क्र. ३ व ४ येथे दररोज ७ कर्मचारी नेमण्यात येतात तसेच गेट क्र.१ प्रमाणेच सुरक्षाव्यवस्था पुरवण्यात आलेली आहे.

शिवाजीनगर न्यायालय येथे सुरक्षाव्यवस्था बळकट करण्यासाठी एकूण ६ डी.एफ.एम.डी. बसविण्यात आले आहेत.

तसेच नवीन इमारत येथे १ स.पो.नि व सर्व्हेलन्स पथकाकडील २ कर्मचारी वॉकीटॉकीसह नेमण्यात येतात. लॉकअप, जुनी इमारत येथे १ स.पो.नि. व २ कर्मचारी पेट्रोलिंग करीता नेमण्यात येतात. गॅंगवॉर मधील आरोपी, मोक्का मधील आरोपी व महत्वाचे आरोपी ज्या ठिकाणी येणार असतील त्यादिवशी ते येणाऱ्या कोर्टासमोर अतिरिक्त बंदोबस्त पुरविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत

**(४२) * २३५९० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नारायण राणे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील उंच इमारतींमध्ये आगी लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने तसेच टॉवर मधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्यामुळे आग विझविण्याच्या कार्यात अग्निशमन दलाच्या जवानांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे महापालिका आयुक्त, यांनी मुंबईतील टोलेजंग इमारतींमधील अग्निशमन यंत्रणेची अचानक तपासणी करण्याचे आदेश अग्निशमन दलाला दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेशानुसार अग्निशमन दलाने दिनांक २३ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत १९३ इमारतींना अचानक भेट देऊन तपासणी केली असता ११४ इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेत त्रुटी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत व नियमांचे पालन न करणा-या इमारतींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत व नियमांचे पालन न करणाऱ्या इमारतींवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना, २००६ मधील कलम ६ अन्वये ११४ इमारतींच्या मालक/भोगवटादार यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणेबाबत**

**(४३) * २४७७० श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १ जानेवारी, २०१६ ते १५ ऑक्टोबर, २०१६ अखेरपर्यंत एकूण ९४१६ शालेय विद्यार्थी, लहान मुले व नागरिकांना भटके कुत्रे चावल्याचा घडलेल्या घटनांमुळे त्यांच्यात भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ४ महिन्यात शालेय विद्यार्थी व लहान मुलांना भटके कुत्रे चावण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडल्याने काही मुलांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता महानगरपालिका रुग्णालयात रेबीजचे औषधे उपलब्ध नसल्याने गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरूपी योग्य तो बंदोबस्त करावा म्हणून सातत्याने मागणी करूनही महानगरपालिकेला सदरहू बंदोबस्त करण्यास अपयश आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात कुत्र्यांनी चावा घेतलेल्यांची व उपचार करण्यात आलेल्या रुग्णांची संख्या पुरुष-५६११, महिला-१७७१ व मुले-२७२० अशी एकूण १०,१०२ आहे.

मात्र या घटनांमुळे नागरिकांमध्ये भिती पसरली आहे, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही,

श्वानदंश झालेल्या रुग्णांना महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयात तसेच तीन लहान दवाखान्यांमध्ये ‘श्वानदंश प्रतिबंधक लस’ (Anti Rabbis Vaccine) व अति जोखीमग्रस्त रुग्णांना ‘इंजेक्शन इम्युनोग्लोबिन’ लस मोफत देवून औषधोपचार करण्यात येतात.

तसेच सदर लसीचा पर्याप्त साठा महानगरपालिकेच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेकडून अभिकरण नेमण्यात आले आहे.

महानगरपालिकेकडून नेमण्यात आलेल्या या अभिकरणाच्या माध्यमातून जानेवारी, २०१५ ते ऑक्टोबर, २०१६ अखेर या कालावधीत एकूण १५९८२ श्वानांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण (अॅन्टी रेबिज वॅक्सीन) करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून त्रास अथवा बाधा होवू नये व श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्याकरीता आवश्यक त्या उपाययोजना महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत समाविष्ट शहरांना निधी उपलब्ध करणेबाबत

**(४४) * २४५५१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील सोलापूर व पुणे या शहरांचा समावेश झालेला असून दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास नागपूर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे व कल्याण-डोंबिवली या शहरांचा सदर योजनेत समोवश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने समावेश झालेल्या सदर शहरांचे किती खर्चाचे आराखडे सादर करण्यात आलेले आहेत व हा निधी कशाप्रकारे व किती कालावधीत या शहरांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान स्मार्ट सिटी योजनेत समावेश झालेल्या सोलापूर व पुणे शहरांसाठी अद्यापही निधी उपलब्ध करण्यात आलेला नसून त्यामुळे तेथील विकास कामे होऊ शकलेली नाहीत, तसेच, पुणे शहराचा स्मार्ट सिटी म्हणून करण्यात येणारा विकास हा कर्ज न काढता केंद्र व राज्य शासनाच्या सहभागातून करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे आयुक्त, महापालिका, पुणे यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) प्रत्येक स्मार्ट शहाराने केंद्र शासनास सादर केलेल्या त्यांच्या स्मार्ट सिटी प्रस्तावात त्यांच्या शहराच्या आवश्यकतेनुसार आराखडे सादर केले आहेत.

या शहरांना सन २०१९ पर्यंत केंद्र शासन हिस्सा ५०० कोटी रुपये व राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचे प्रत्येकी २५० कोटी रुपये असे मिळून एकूण १००० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
(३) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या पुणे व सोलापूर स्मार्ट सिटी शहरांना प्रत्येकी दोन वर्षांसाठी केंद्र शासनाचे रुपये १९६ कोटी व राज्य शासनाचे रुपये ९३ कोटी असे एकूण रुपये २८९ कोटी इतका अनुज्ञेय निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये पुणे शहराचा स्मार्ट सिटी म्हणून करण्यात येणारा विकास हा कर्ज न काढता केंद्र व राज्य शासनाच्या सहभागातून करण्याबाबत कोणताही पत्र व्यवहार शासनाशी केला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेचा अनेक मोठ्या विकासकांनी मालमत्ता कर थकविल्याबाबत

**(४५) * २६१२२ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील अनेक मोठ्या विकासकांनी ३,३०० प्रकरणात बांधकाम करुन वर्षानुवर्षे आपल्याकडे ठेवलेल्या भूखंडावर आकारण्यात येणा-या मालमत्ता कराची सुमारे ६८१ कोटी रुपयांची कर आकारणीच झाली नसल्याची बाब दिनांक २३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडावर बांधकाम सुरु करण्यापूर्वी किंवा उभ्या राहिलेल्या बांधकामाला भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी मोकळ्या भूखंडावरील कराचा भरणा पूर्ण करणे आवश्यक असतानाही महापालिकेने विकासकांना बेकायदा भोगवटा प्रमाणपत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार सदरहू विकासकांविरुध्द कारवाई करुन थकित ६८१ कोटी रुपये निधी व्याज व दंडासहित वसूल करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेकडून उक्त मालमत्तांची कर आकारणी करण्यात आली आहे. मात्र याबाबतची कर देयके काढण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरणी भुखंडावरील कराचा पूर्ण भरणा करुन घेतल्यानंतरच ना-हरकत प्रमाणपत्रे देणे अपेक्षित आहे. मात्र काही प्रकरणी पूर्ण रक्कम भरुन न घेता अनामत रक्कम भरुन घेऊन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी महानगरपालिकेकडून सर्वंकष चौकशी करण्यात येत असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी महानगरपालिकेकडून तत्कालीन करनिर्धारक व संकलक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

महानगरपालिकेकडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीची मालमत्ता कर देयके व्याजासहीत वितरीत करण्यात आली असून वसूलीची कार्यवाही सुरु असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विकासकाने नगरविकास विभागाच्या परिपत्रकाचा गैरवापर केल्याबाबत**

**(४६) * २५६०८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत (एसआरए) बांधलेल्या सदनिकांपैकी ठराविक सदनिका एसआरए प्राधिकरणाला देणे बंधनकारक असतांना घाटकोपर (मुंबई) येथील गर्भश्रीमंतांच्या लोकवस्तीतील एसआरए प्रकल्पामध्ये प्राधिकरणाला द्यावयाच्या सुमारे ९० सदनिका त्याच ठिकाणी देण्याऐवजी विकासकाने मालवणीमध्ये तीन ठिकाणी विखुरलेल्या परिसरात दिल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने नगरविकास विभागाच्या परिपत्रकाचा गैरवापर करून ९० सदनिका मालवणी येथे हलविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार सुमारे १०० कोटी रूपयांचा गैरव्यवहार करणा-या विकासकांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मौजे घाटकोपर येथील अंतिम भूखंड क्र.३५३/३ टीपीएस ३ या मिळकतीवर विकासक मे.किलॅन्ड डेव्हलपर्स यांनी वास्तुविशारदामार्फत विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(१४) च्या तरतुदीनुसार कायम स्वरुपी संक्रमण सदनिका बांधण्याची योजना सादर केली होती. या योजनेस प्राधिकरणाने दिनांक २९ जानेवारी, २०१४ रोजी आशयपत्र दिले होते.

तद्‌नंतर विकासकाने उक्त योजनेचे (१) मौजे मालवणी, खारोडी येथील न.भू.क्र.२८९७(पै), (२) न.भू.क्र.३३८७ अे, ३३८७ बी, ३३८७ डी आणि (३) मौजे मालवणी येथील न.भू.क्र.३३२७ अे-१ (पै) या योजनेशी एकत्रिकरण करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यासंदर्भात नगरविकास विभागाच्या दिनांक

३१ ऑक्टोबर, २००८ च्या आदेशातील तरतुदीनुसार त्यास दिनांक २१ मे, २०१५ रोजी मंजूरी देवून दिनांक २५ मे, २०१५ रोजी सुधारीत आशयपत्र दिले आहे. त्यानुसार मौजे घाटकोपर येथील कायमस्वरुपी संक्रमण शिबिरांचे ३०५१ चौ.मी. (९० सदनिका) क्षेत्र मौजे मालवणी येथील वरील तीन योजनामध्ये आणि मालवणी येथील त्याच प्रमाणातील विक्रीघटकाचे क्षेत्र घाटकोपर येथील योजनेमध्ये हस्तांतरीत केले आहे.

उक्त आदेशाच्या तरतुदीनुसार मालवणी येथून घाटकोपर येथे हस्तांतरीत केलेल्या विक्री घटकाच्या क्षेत्राबाबत शिघ्रगणक दरानुसार फरकाची रुपये ५ कोटी २१ लक्ष इतकी रक्कम विकासकाकडून वसूल केलेली आहे.

(२) नगरविकास विभागाच्या उक्त परिपत्रकाचा गैरवापर झालेला नाही, असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व शाळा डिजीटल करण्याबाबत**

**(४७) * २३७७६ श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १४९६८ ला दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळा माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत डिजिटल कनेक्टीव्हीटीने जोडण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच उक्त निर्णयाची अंमलबजावणी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त योजना राबविण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. भारत नेट प्रकल्पांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत मधील एका शाळेला डिजिटल कनेक्टीव्हीटीने डिसेंबर, २०१८ अखेर जोडणे प्रस्तावित आहे.

(२) भारतनेट या केंद्र शासनाच्या प्रकल्पामार्फत ग्रामपातळीवरील प्राथमिक/माध्यमिक शाळांना ग्रामपंचायतीमधून जोडणी उपलब्ध करून देण्यात येईल. सद्यःस्थितीत राज्यात याबाबत सर्वेक्षणाचे करण्याचे काम सुरू आहे.
(३) केंद्र शासनाच्या नविन सूचनेप्रमाणे राज्याने सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. प्रकल्प अहवाल झाल्यानंतर आवश्यक निधीची निश्चिती करण्यात येईल. त्याप्रमाणे केंद्र शासनाकडे निधी उपलब्ध करण्याकरीता अहवाल सादर करण्यात येईल प्रकल्पाकरिता काही प्रमाणात केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील हत्याकांडाचे खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याबाबत**

**(४८) * २५८६०  श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात लोणी, मावळा, खर्डा व जवखेडे हत्याकांडाचे खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याची शासनाने घोषणा केली असतानाही ही प्रकरणे न्यायालयात नेहमीप्रमाणेच सुरू असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर खटले घोषणा केल्याप्रमाणे फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

अ) लोणी मावळा येथील घटनेबाबतचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालू आहे.

ब) जवखेड येथील घटनेबाबतचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याबाबत मा.उच्च न्यायालयास दिनांक १६/०८/२०१६ रोजी विनंती केलेली आहे.

क) खर्डा येथील घटनेबाबतचा खटला मा.सत्र न्यायालय क्र.५, अहमदनगर या न्यायालयात चालू आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी लोणी मावळा येथील घटनेबाबतचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालू असून जवखेड व खर्डा येथील घटनांबाबतचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याबाबत मा.उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.

तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियमांतर्गत प्रकरणे लवकर निकाली काढ़ण्याबाबत, न्यायालयीन प्रकरणाचे समान वाटप करण्याबाबत, व्हिडीओ कॉन्फरसिंगचा वापर करण्याबाबत आणि न्यायिक अधिका-यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने अहमदनगरसह राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालयांना सूचना दिल्या आहेत.

-----------------

**मुंबईत गिरणी कामगारांना देण्यात आलेल्या घरांना**
**सेवाशुल्क व मालमत्ता करात सूट मिळणेबाबत**

**(४९) * २४०४२ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १४८५१ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गिरणी कामगारांना देण्यात आलेल्या घरांना सेवाशुल्क मालमत्ता करात सूट द्यावयाच्या विचाराधीन मागणीवरील शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार गिरणी कामगारांच्या घरांना सेवाशुल्क मालमत्ता करात सूट देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईमध्ये गिरणी कामगारांना देण्यात आलेल्या घरांचे सेवाशुल्क व मालमत्ता कराचा भरणा म्हाडामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्यात येतो. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये मुंबई गिरणी कामगारांना मालमत्ता करात सूट देण्याची तरतूद नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे तुळींज (ता.वसई, जि.पालघर) येथील रहिवाशांची युनिवर्सल ग्रुप ऑफ कंपनीज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी फसवणूक केल्याबाबत**

**(५०) * २३८९३ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २२५५६ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुळींज (ता.वसई, जि.पालघर) येथील रहिवाशांची युनिवर्सल ग्रुप ऑफ कंपनीज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी फसवणूक केल्याप्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून शासनास चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

यासप्रकरणी दोषी ९ विकासकांविरुध्द भा.दं.वि. कलम ४२०, ४६२, ४६७, ४६८, ४७१, ४७४, व ३४ अन्वये अनधिकृत बांधकाम तसेच बनावट बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रकरणी तुळींज पोलीस ठाणे येथे दिनांक १७/०७/२०१६ रोजी महानगरपालिकेमार्फत रजिस्टर गुन्हा नोंद क्र.५४/१६, दिनांक १३/०७/२०१६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

उक्त प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

(२) होय.

(३) होय, जिल्हाधिकारी, पालघर यांना चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथाडी कामगारांसाठी राखीव असलेली घरे इतरांना देण्यात आल्याबाबत**

**(५१) * २३५५८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत स्थलांतर झालेल्या कामगारांना सन १९९३ साली ५ हजार, सन १९९९ साली ४९० तर सन २०१५ मध्ये ४९० घरांचे वाटप शासनाने केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कामगारांसाठी राखीव असलेली घरे इतर संस्थांना देण्याचा यापूर्वीही प्रकार निदर्शनास आला असून त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा झाली असून कामगारांची घरे इतरांना मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणारे रॅकेट माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून याप्रकरणी श्री.आनंदराव धनावडे, श्री.प्रदिप वाडकर, श्री.रामचंद्र शेडगे, श्री.राजाराम धनावडे यांच्यासह १०४ जणांनी नवी मुंबई येथील पोलीस ठाण्यात माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळुन आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) सदर प्रकरणी दिनांक २७/७/२०१६ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला असून एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.रजि.नं.१९५/१६ भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७२, ४७३, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खिर्डीसाठे (ता.येवला, जि.नाशिक) येथील शहीद जवानाचे कुटुंबिय राज्य शासनाच्या अनुज्ञेय आर्थिक मदतीपासून वंचित असल्याबाबत**

**(५२) * २४३६९ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम बंगालमध्ये नक्षलवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना दिनांक ३० सप्टेंबर, २०११ रोजी वा त्यासुमारास शहीद झालेल्या खिर्डीसाठे (ता.येवला, जि.नाशिक) येथील जवानाच्या कुटुंबियांना शासनाच्या अनुज्ञेय रकमेपासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर जवानाच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ३०/०९/२०११ रोजी प्रशांत बबन नागरे हे HQ ८७ Bn,Bsf मध्ये कार्यरत असतांना पश्चिम बंगाल (मालदा) येथे दिवंगत झाले आहेत. दिवंगत जवान प्रशांत बबन नागरे, हे शहीद झाल्याबाबतची कोणतीही लेखी स्वरुपाची माहिती केंद्रीय गृह विभाग अथवा बीएसएफ दल यांचेकडून सैनिक कल्याण विभागास प्राप्त झालेली नाही तसेच दिवंगत जवानाच्या कुटुंबियांना राज्य शासनाच्या अनुज्ञेय आर्थिक मदतीपासून वंचित ठेवल्याबाबतची तक्रार/ निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) दिवंगत प्रशांत बबन नागरे या जवानाच्या कुटुंबियांशी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नाशिक यांच्यामार्फत संपर्क साधण्यात आला असून दिवंगत जवान प्रशांत बबन नागरे हे शहीद झाल्याबाबतची आवश्यक कागदपत्रे HQ ८७ Bn,Bsf यांचेकडून मागविण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथे नदीकाठची पूरनियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत

**(५३) * २४७५४ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे नदीकाठची पूरनियंत्रण रेषा (ब्ल्यू लाईन आणि रेडलाईन) अद्याप निश्चित झालेली नसल्यामुळे नदीजवळच्या झोपड्यांचे पुनर्वसन प्रलंबित असून दरवर्षी पावसाळ्यात येथील कुटुंबांचे स्थलांतर करण्याची वेळ महापालिकेवर येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीपात्रालगतच्या अधिकृत व अनधिकृत झोपड्यांची संख्या निश्चित होत नसल्यामुळे स्थलांतराबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) नुसार शासनाने येथील झोपड्यांचे सर्वेक्षण करुन पात्र व अपात्र झोपड्या ठरवून पूर नियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जलसंपदा विभाग, खडकवासला, पुणे यांनी दिनांक ४/११/२०१६ रोजी पूररेषेचे नकाशे अक्षांश, रेखांशासह साक्षांकित करुन पुणे महानगरपालिकेस पाठविले आहे. त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेकडून झोपड्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) व (३) नदीकाठची पूरनियंत्रण रेषा आता निश्चित झाली असल्याने झोपडपट्टी सर्वेक्षण व झोपडपट्टी पात्र/अपात्र संख्या निश्चित करण्यासाठी तसेच पुनर्वसन करण्यासाठी संबंधित विभागांशी संपर्क साधून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषण होऊ नये याकरिता ध्वनिमापक यंत्र खरेदी करण्याबाबत

**(५४) * २४९१५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून पोलिसांना १ हजार ८४३ ध्वनिमापक यंत्र देण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने ध्वनिमापक यंत्र खरेदी करण्याबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण करून न्यायालयाच्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) १८५३ नग ध्वनिमापक यंत्र खरेदी करण्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत ९४० नग नॉईस लेव्हल मीटर प्राप्त झालेले आहेत. उर्वरित ९१३ नग माहे डिसेंबर अखेर प्राप्त होणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सातारा जिल्हयातील ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांचे वेतन थकित असल्याबाबत**

**(५५) * २३६९० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली सुरक्षा बोर्डाने नेमलेल्या सातारा जिल्हयातील ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांना माहे डिसेंबर, २०१५ पासून ते माहे सप्टेंबर, २०१६ अखेर वेतन दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर सुरक्षा रक्षकांना थकीत वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे, माहे मे व जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या तीन महिन्यांचे वेतन ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालय या नोंदित आस्थापनेकडून मंडळाकडे प्राप्त न झाल्याने सुरक्षा रक्षकांचे देणे थकीत आहे.

(२) होय, माहे मे व जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीचे वेतन प्राप्त करुन घेण्यासाठी मंडळामार्फत ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत असून, नियमातील तरतुदीनुसार सदर आस्थापनेविरुध्द कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) जिल्हा रुग्णालयाकडे निधी उपलब्ध न झाल्याने वेतन अदा करण्यास विलंब झालेला आहे.

-----------------

**नीरा-नरसिंहपूर (ता.इंदापूर, जि.पुणे) या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(५६) * २५१२६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीरा-नरसिंहपूर (ता.इंदापूर, जि.पुणे) या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी अवैध धंदे सुरु असून बनावट दारु व जुगाराचे अड्डे राजरोस सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथे येणाऱ्या भाविकांना त्रास होत असून भाविकांचे प्रमाण कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नीरा-नरसिंहपूर (ता.इंदापूर, जि.पुणे) या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू नाहीत. तथापि सदर ठिकाणी चोरून दारू विकणाऱ्या दोन इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली असून त्याबाबत इंदापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२१३/२०१६ व ४५६/२०१६ असे दोन गुन्हे मुंबई प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५(ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याच्या शासनाने घेतलेला निर्णय**

**(५७) * २३६०१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २०६११ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील (मुंबई वगळता) शहरी भागातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १० मार्च, २०१६ रोजी विधिमंडळ सभागृहात केली असल्याने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंतची सर्व अनधिकृत बांधकामे अधिकृत होतील, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचा हा निर्णय राज्य घटनेच्या समानतेच्या तत्वाच्या विरोधात असल्याने मा.उच्च न्यायालयाने शासनाचा सदरचा निर्णय अवैध ठरविला असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निकालानूसार अनधिकृत बांधकाम प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामांना निर्बंध/आळा घालण्याकरीता व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सवलती प्रस्तावित करून अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करणेसाठी शासनाने धोरण तयार केले होते. सदर धोरणातील निश्चित होणाऱ्या निकषाच्या आधारे नियमित होणारी दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंतची अनधिकृत बांधकामे नियमित होतील, असे प्रस्तावित केले होते व सदर धोरण मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयात सादर केले होते. मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यास मनाई केली आहे. तथापि, नवीन धोरण सादर करण्यास मुभा दिलेली होती.

(३) व (४) मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७/४/२०१६ च्या आदेशामध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन शासनाने अनधिकृत बांधकामांवर आळा घालणे व नियमित करणाच्याबाबत नवीन धोरण तयार केले असून त्यास मा.मंत्रीमंडळाने दिनांक २८/७/२०१६ च्या बैठकीमध्ये मंजूरी दिलेली आहे. मा.मंत्रीमंडळाने मंजूरी दिलेले धोरण दिनांक २९/७/२०१६ च्या शपथपत्रान्वये मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेले आहे. यावर मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

### माझगाव येथील इमारत आग दुर्घटनेत ४४ कुटुंब बेघर झाल्याबाबत

**(५८) * २६१२७ श्री.सुजितसिंह ठाकूर** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) मध्ये म्हातार पाखाडी येथील बंदूकवाला चाळ या दोन मजली उपकर प्राप्त इमारतीस दिनांक ०७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अचानक लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण दुसरा मजला जळून खाक होऊन इमारतीतील ४४ कुटुंबे बेघर झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेची म्हाडाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने नव्या गृहनिर्माण धोरणात जाहीर केल्यानूसार बंदूकवाला उपकर प्राप्त इमारतीतील ४४ भाडेकरु रहिवाशी कुटुंबांना त्याच परिसरात संक्रमण शिबिरात गाळयाची पर्यायी व्यवस्था करुन उक्त इमारतीचे वर्षभरात पुनर्विकास करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय हे खरे आहे.

(२) म्हाडाच्या चौकशीमध्ये बंदुकवाला इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

(३) सदर इमारतीच्या पुनर्विकासाकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाव्दारे विकासक श्री. नवदीप एस. शर्मा यांस दिनांक २७/०८/२०१५ रोजी सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर विकासकाव्दारे भाडेकरु/रहिवाश्यांची राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ च्या आगीच्या दुर्घटनेनंतर विकासक व भाडेकरु यांच्या संयुक्त मागणीनुसार सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून सदर इमारतीतील २१ भाडेकरु/रहिवाशी यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरातील गाळयांचे वितरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भोसरी येथील नाशिक-पुणे महामार्गावरील "फूट ओव्हर ब्रिज" बांधकामाबाबत**

**(५९) * २५६१३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी येथील नाशिक-पुणे महामार्गावर शितल बाग येथे "फूट ओव्हर ब्रिज" च्या बांधकामासाठी दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजी रूपये ७१ लाख ५ हजार ८७ रुपयांची मुळ निविदेमध्ये ३१ टक्के सुधारित जादा दराची निविदा मंजूर करुन रूपये ९३ लाख ७ हजार ६६४ रुपयांचे काम करण्याबाबत मेसर्स धनेश्वर कन्स्ट्रक्शन सोबत करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाचे काम अपूर्ण असून या बांधकामाच्या खर्चात वाढ होऊन आजमितीस रूपये ७ कोटी ३९ लाख इतका झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पुलाचे काम कधीपर्यत पूर्ण करण्याचा करार ठेकेदाराबरोबर झाला होता, तसेच, उपरोक्त पुलाच्या कामास विलंब होत असल्याने गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कामात गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करून पुलाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) सदर पुलाचे बांधकाम दिनांक ३०/९/२०१६ रोजी पुर्ण झाले असून तो नागरिकांच्या वापरासाठी खुला करण्यात आला आहे. या बांधकामाचा खर्च आज अखेर रूपये ५,५४,२०,१८६/- एवढा झालेला आहे.
(३) व (४) या प्रकरणी दिनांक ३०/०९/२०१६ रोजी धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आले होते व सदर काम दिनांक १२/५/२०१४ अखेर पर्यंत पूर्ण करावयाचे होते.

तथापि, प्रस्तुत ब्रिज जुना व साध्या पध्दतीचा असल्याने तो अत्याधुनिक पध्दतीने (केबल स्टेड फुट ओव्हर ब्रिज) बांधण्यासाठी दिनांक १८/८/२०१४ रोजी फेरनिविदा प्रसिध्द करण्यात आली व धनेश्वर कन्स्ट्रक्शन या सर्वात कमी दराच्या निविदाधारकास दिनांक १/१/२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आला.

सदर पूल बांधण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव गेला असता त्यांनी प्रकल्पाच्या डिजाईन मध्ये काही बदल सुचविले होते त्याची पूर्तता केल्यानंतर दिनांक १४/३/२०१६ रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या अंदाजपत्रकातील सुधारित रकमेसाठी दिनांक २०/४/२०१६ रोजी पुन्हा प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

प्रस्तूत पूलाचे बांधकाम करण्यास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. याप्रकरणी चौकशी करण्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिनांक १४/९/२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**औरंगाबाद येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्पाबाबत**

**(६०) * २६००० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रासाठी जागा निश्चित न झाल्याने सॉर्टिंग शेड उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने शहर व परिसरात कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी शोधलेल्या जागांना विरोध सुरु झाला असून नायगव्हाण परिसरातील खंडेवाडी आणि हर्सूल सावंगी येथील नागरिकांनी आयुक्त, औरंगाबाद महापालिका, विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना याप्रकरणी निवेदन देवून विरोध दर्शविला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी पर्यायी जागा शोधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंत: खरे आहे.

औरंगाबाद शहरामध्ये निर्माण होणाऱ्या सुक्या कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी ९ ठिकाणी सॉर्टिंग शेड उभारण्याकरिता जागा निश्चितीचा प्रस्ताव दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी स्थायी समितीने मंजुर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पर्यायी जागा शोधण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात औरंगाबाद महानगरपालिकेकडून स्थगित ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुंबई महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव विभागातील अनियमिततेबाबत

**(६१) * २३८९६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव (शहर) यांच्यामार्फत मंजूर करण्यात आलेल्या अनेक (फाईल नं. इबी/५४१५/ डी/ए, इबी/२६१४, २६१४, ८०८, ६०३५, ४६६ बी/ए) प्रकल्पांमध्ये मंजूर नकाशानुसार काम केले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांना इमारत प्रस्ताव विभागातील अभियंते तसेच वार्ड मधील इमारत बांधकाम विभागातील अभियंत्यांमार्फत अभय देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांमधील अनियमिततेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रस्तावित इमारतींचे नकाशे महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून मंजूर केले जातात व मंजूर नकाशानुसार काम झाले आहे याची खातरजमा झाल्यानंतर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते.

फाईल क्रमांक ईबी/५४१५/डी/ए मध्ये नमूद इमारतीस महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने नकाशे मंजूर केले असून, सदर इमारतीस दिनांक २३/०७/२०१३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

फाईल क्रमांक ईबी/२६१४/बी/ए मध्ये नमूद इमारतीची महानगरपालिकेमार्फत पाहणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

फाईल क्रमांक ईबी/८०८/बी/ए यामधील इमारतीच्या विकासकाने मंजुर आराखडयानुसार काम केलेले नसल्यामुळे विकासकास महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ ए अन्वये दिनांक २१/०७/२०१४ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार मंजुर आराखडयापेक्षा केलेले अधिकचे बांधकाम विकासकाने स्वत:हून निष्कासित केल्याचे दिनांक २५/०९/२०१४ रोजी कळविले आहे व उर्वरित अनधिकृत बांधकाम

महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०/०९/२०१४ व ०१/१०/२०१४ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

फाईल क्रमांक ईबी/६०३५/बी/ए यामधील इमारतीचे बांधकाम अद्यापि पूर्ण झालेले नसल्यामुळे सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

फाईल क्रमांक ईबी/४६६/बी/ए यामधील इमारतीत विकासकाने मंजूर आराखडयापेक्षा अधिकचे काम केल्यामुळे सदरचे बांधकाम दिनांक १५/०४/२०१५ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठातील अभियांत्रिकीच्या उत्तरपत्रिका गैरप्रकाराबाबत**

**(६२) * २३५७८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २०१३८ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील अभियांत्रिकीच्या उत्तरपत्रिका गैरव्यवहार केल्याप्रकरणी १० आरोपींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्यातील १० आरोपी कोण आहेत, त्यांचे विद्यापीठातील कर्मचारी व अन्य संबंधित अधिकारी यांचा संबंध आहे काय, तसेच विविध विषयातील ९९ उत्तरपत्रिका व रोख रक्कम रूपये १ लाख १८ हजार कोणाकडून हस्तगत करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपींना मदत करणाऱ्या विद्यापीठातील कर्मचारी व अन्य संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू प्रकरणात ९ हंगामी व १ कायमस्वरुपी कर्मचारी यांना अटक करण्यात आली असून त्यांचेकडे अद्यापपर्यंत १०० उत्तरपत्रिका व रुपये १,१८,०००/- एवढे हस्तगत करण्यात आले आहेत. तपासामध्ये विद्यापीठातील अधिकाऱ्यांचा सहभाग दिसून आला नसल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी एकूण १० आरोपीविरुध्द भा.दं.वि.स. कलम ४२०,

४०६, ४०८, ३४ अन्वये भांडूप पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२२४/१६ दाखल असून मा. महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अनेक वाहनांच्या पुढील काचेवर पोलीस असे लिहिलेल्या पट्टया चिकटवून त्याचा गैरवापर होत असल्याबाबत**

**(६३) * २४७५५ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक वाहनांच्या पुढील काचेवर पोलीस असे लिहिलेल्या पट्टया चिकटवून गाड्यांचा टोल वाचविण्यासाठी तसेच गाडी पार्किंग करण्यासाठी व प्रसंगी इतरांवर दादागिरी करण्यासाठीही याचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीरपणे गाडीच्या काचांवर पोलीस अशा पट्टया चिटकविणाऱ्या गाड्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी राज्यात सातारा व वाशिम जिल्ह्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यातील खंडाळा पोलीस स्टेशन गु.र.नं.९९/२०१६ भा.दं.वि. कलम ४६८, ४२०, ४१९, १७१, म.पो.का. कलम ३७(१), १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आले आहे. तसेच वाशिम जिल्ह्यातील अनसिंग पोलीस स्टेशन गु.र.नं. १२९/२०१६ भा.दं.वि. कलम १७१, ३४ या गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर दोन्ही गुन्हे पोलीस तपासावर आहेत. या व्यतिरिक्त मुंबई शहरात खाजगी वाहनांवर जानेवारी, २०१६ पासून आतापर्यंत मोटार वाहन कायदा कलम १३४ (६) सह १७७ व केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ कलम ५०, ५१ अन्वये ७२ कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुल येथील उड्डाणपूल व रस्त्याचे बांधकामाबाबत**

**(६४) * २४९१७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुल येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी या परिसरात चार उड्डाणपूल व एका रस्त्याचे बांधकाम केले जाणार असून दोन उड्डाणपूल सी-लिंकपर्यंत येण्या-जाण्यासाठी बांधण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांचा सविस्तर आराखडा तयार करून निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) प्रकल्पाचा सविस्तर आराखड्याचा अभ्यास केल्यानंतर प्रथम टप्यात वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपूल व धारावीकडून सी-लिंककडे जाणारा वळण रस्त्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त सर्व निविदांची छाननी करून मे.सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या लघुत्तम निविदेस कार्यकारी समितीने मंजूरी दिल्यानंतर निविदाकारास कामाचे स्विकृती पत्र दिनांक २५/१०/२०१६ रोजी देण्यात आले.

-----------------

**ठाणे-भिवंडी मार्गावरील पुलाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत**

**(६५) * २४०४८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्याहून कल्याण-भिंवडीकडे जाण्यासाठी असलेल्या महत्त्वाच्या मार्गावर गेली अनेक वर्ष पूलाचे काम प्रलंबित असल्याने या परिसरात १० मिनिटांच्या अंतरासाठी तासन तास प्रवाश्यांना अडकून रहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी करूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ठाणे-भिंवडी रस्त्यावरील माणकोली व राजणोली येथे उड्डाणपुल बांधण्याचे काम सुरु आहे. माणकोली येथील उड्डाणपुलाच्या शेजारचे सेवा व स्लीप रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सदर उड्डाणपुलाचे काम ७०% पूर्ण झाले असून सदर पुलाच्या चार वाहिन्यांचे काम माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच राजणोली येथील सेवा व स्लिप रस्त्याचे डाव्या बाजूचे काम पूर्ण झाले असून उजव्या बाजूचे काम प्रगतीपथावर आहे. सदर पुलाच्या चार वाहिन्यांचे काम माहे मे, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असून दोन्ही दिशेकडील वाहतूक सोडून उर्वरीत चार वाहिन्यांचे काम माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.